**प्रकल्प प्रवर्तक मे. गंगामाई इंडस्ट्रीज ॲण्ड कंन्स्ट्रक्शन्स लिमिटेड (गं.ई,ॲ,क.लि.) हरिनगर, नजिक बाभुळगांव, पोस्ट-राक्षी, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर यांच्या प्रस्तावित साखर आणि सह-वीजनिर्मिती प्रकल्पाच्या ऊस गाळप क्षमता ५५०० टीसीडी वरुन ९००० टीसीडी पर्यंत आणि सहवीजनिर्मिती प्रकल्पाची क्षमता ३२ मेगावॅटवरुन ३९ मेगावॅटपर्यत क्षमतेच्या विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत-**

प्रकल्प प्रवर्तक मे. गंगामाई इंडस्ट्रीज ॲण्ड कंन्स्ट्रक्शन्स लिमिटेड (गं.ई,ॲ,क.लि.) हरिनगर, नजिक बाभुळगांव, पोस्ट-राक्षी, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित साखर आणि सह-वीजनिर्मिती प्रकल्पाच्या ऊस गाळप क्षमता ५५०० टीसीडी वरुन ९००० टीसीडी पर्यंत आणि सहवीजनिर्मिती प्रकल्पाची क्षमता ३२ मेगावॅटवरुन ३९.० मेगावॅटपर्यत क्षमतेच्या विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळ कामगार सभागृह मे. गंगामाई इंडस्ट्रीज ॲण्ड कंन्स्ट्रक्शन्स लिमिटेड (गं.ई,ॲ,क.लि.) हरिनगर, नजिक बाभुळगांव, पोस्ट-राक्षी, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

उप प्रादेशिक अधिकारी तथा आयोजक यांनी, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती अध्यक्ष तथा निवासी उप जिल्हाधिकारी,

सदस्य पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. गंगामाई इंडस्ट्रीज अ‍ॅण्ड कंन्स्ट्रक्शन्स लिमिटेड (गं.ई,अॅ,क.लि.) हरिनगर, नजिक बाभुळगांव, पोस्ट-राक्षी, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर, महाराष्ट्र यांच्या विस्तारीकरण करण्याबाबतचा जाहिर लोक सुनावणीचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य

जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदुषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनेचा विचार करणे आहे.

मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि.३०/०७/२०२६ रोजी आयोजित करण्याबाबत मान्यता देण्यात आली. मंडळाचे कार्यालयीन आदेश दि.०२/०७/२०२६ रोजी खालील प्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>यांचे प्रतिनिधी —<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>नाशिक. | - **सदस्य** |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहिल्यानगर. | - **आयोजक** |

Shinde

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक २५/०६/२०२६ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर.

२) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, अहिल्यानगर.

४) उप विभागीय अधिकारी, शेवगांव – पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर.

५) तहसीलदार, तहसील कार्यालय, शेवगांव, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर.

६) पंचायत समिती कार्यालय, शेवगांव, ता.शेवगांव, जि. अहिल्यानगर.

७) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये – नजीक बाभुळगांव, खानापुर, माळेगांव ने., खुंटेफळ, राक्षी, घोटण, तळणी, कुरुडगांव, एरंडगांव, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर.

Shinde

८) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

९) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३ रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१०) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, नाशिक.

११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, पहिला मजला, हॉल नं.२ व ३, टी.व्ही. सेंटरजवळ, सावेडी, अहिल्यानगर -४१४ ००३

१२) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांना ०५ निवेदने प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले व सदरील सुचनांची, आक्षेपांची

इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येऊन बैठकीचे व्हिडीओ रेकॉर्डींग पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल.

आयोजकांनी मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याचे आदेशीत केले.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले व विस्तारानंतर होणारा पाण्याचा वापर व सांडपाण्याची निर्मीती याबाबत माहिती दिली व सध्याच्या प्रकल्पात  सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उपलब्ध आहे व प्रक्रिया केलेले सांडपाणी पुनर्वापरीत केले जाते व हिच पध्दत विस्तारिकरणानंतर चालु राहील.  विस्तारीकरणासाठी, सध्याच्या बॉयलरची क्षमता १४० TPH वरून १६० TPH आणि ३० TPH वरून ४० TPH पर्यंत वाढवली जाईल. वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी या बॉयलरना आधीच ESP (इलेक्ट्रोस्टॅटिक प्रेसिपिटेटर) बसवण्यात आले आहे. तसेच बॉयलरची राख विटभट्टी उत्पादकांना देण्यात येते.

तसेच, प्रकल्प स्थळाच्या १०.० किमी त्रिज्येतील विविध पर्यावरणीय घटकांबाबत - जसे की भूजल व पृष्ठभागावरील पाणी, हवेची गुणवत्ता, मृदा विश्लेषण, ध्वनी पातळी, परिसराची सामाजिक-आर्थिक स्थिती

आणि स्थानिक परिसंस्था व जैवविविधता - सर्वसमावेशक माहिती आणि देखरेखीचे निष्कर्ष सादर करण्यात आले.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना किंवा टीकाटिप्पणी उपस्थित करावयाच्या असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात. आपले नांव व गावाचे नांव प्रथम सांगण्यात यावे. आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री भाऊसाहेब मनोहर ढोले, रा शेवगांव, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर.**

प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पातुन किती ऊसाचे गाळप व साखरेची निर्मीती होणार आहे.

- **प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगीतले की**, सध्याची ऊस गाळप क्षमता ५५०० टन प्रतिदिन आहे व विस्तारिकरण झाल्यानंतर

९००० टन प्रतिदिन इतकी होणार आहे. साखरेचा उतारा ११ ते ११.५ असल्यास तेवढया प्रमाणात साखर तयार होणार आहे.

**२) श्री. कुंडलिक घुगे, रा. घोटन, ता. शेवगांव**

प्रस्तावित प्रकल्प विस्तारामध्ये निर्माण होणाऱ्या विजेचा शेतकऱ्यांना आणि आसपासच्या गावांना काय फायदा होईल?

- **प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सल्लागारांनी सांगितले की,** विस्तारीकरणामुळे निर्माण होणारी वीज कारखान्यातच वापरली जाईल आणि अतिरिक्त वीज 'महावितरण'ला (राज्य वीज वितरण कंपनी) पुरवली जाईल; त्यानंतर महावितरण ती वीज शेतकरी आणि आसपासच्या गावांना वितरित करेल.

**३) सौ. दिपाली सोमनाथ पवार, रा. हरिनगर, ता. शेवगांव**

प्रस्तावित प्रकल्पाचा एकुण खर्च किती आहे.

- **प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगीतले की,** प्रस्तावित प्रकल्पाचा नियोजीत खर्च ८२.० कोटी आहे.

**४) श्री. विष्णु घणवट, रा. नजिक बाभुळगांव, ता. शेवगांव,**

कारखाण्याचे विस्तारिकरण होत असल्यामुळे ही आनंदाची बाब आहे. प्रकल्पात स्थानिक लोकांना प्राधान्यक्रमाणे रोजगार उपलब्ध होणार आहेत काय? तसेच सी एस आर फंडातुन परिसरातील गावांना वीज, रस्ते, शैक्षणीक व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देणार आहेत काय.

- **प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी नमूद केले की,** स्थानिक रोजगाराबाबतचा हा एक धोरणात्मक विषय असून त्याचे परिणाम सकारात्मक असतील. अहिल्यानगरचे माननीय जिल्हाधिकारी यांची मंजुरी मिळाल्यानंतर, परिसरातील गावांमध्ये रस्ते विकास, वीजपुरवठा, शैक्षणिक सुधारणा आणि आरोग्य सुविधांसाठी सीएसआर (CSR) निधीचा वापर केला जाईल.

**५) श्री. बाबासाहेब गर्जे, रा. नजिक बाभुळगांव, ता. शेवगांव,**

विस्तारिकरण प्रकल्पास माझा पाठिंबा आहे असे सांगीतले.

**६) श्री. सोपान ढोरकुले, रा. नजिक बाभुळगांव, ता. शेवगांव**

गंगामाई या उद्योगामुळे आमच्या गावाचे, भागाचे नाव जिल्ह्यात, राज्यात गेले आहे. माझा प्रश्न आहे विस्तारिकरणामुळे जे ध्वनी प्रदुषण निर्माण होणार आहे, त्यावर काय उपाययोजना करण्यात येणार आहेत.

- **प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगीतले की,** गंगामाई या उद्योगामुळे या भागाचा विकास झाला आहे हे बरोबर आहे. ध्वनी प्रदुषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत व उद्योगाच्या सर्व परिसरात झाडे लावण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत आम्ही परिसरातील ध्वनीचे मोजमाप केलेले आहे त्याची पातळी विहीत मर्यादेत आहे.

**७) श्री. सुनंदा रेड्डी,**

मी प्रकल्प प्रवर्तकाचे विस्तारिकरण योजिल्याबाबत अभिनंदन करत आहे. मी प्रकल्प प्रवर्तकांना काही सुचना करत आहे.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी पावसाच्या पाण्याची साठवणुक करावी, त्यामुळे परिसरातील भुभागातील पाण्याच्या साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे.
- प्रकल्प प्रवर्तक यांनी इतर कोणतेही झाडे लावण्यापेक्षा औषधी वनस्पती व फळे देणारी झाडे लावण्यात यावीत.
- प्रकल्प प्रवर्तक यांनी स्थानिक युवक - युवतींसाठी शासनाच्या मदतीने कौशल्य विकसीत करणारे प्रशिक्षण आयोजित करावेत.
- पर्यावरण, वने व हवामान मंत्रालय यांनी विस्तारिकरण प्रकल्पास त्वरित मान्यता देण्यात यावी हि विनंती करतो.

**८) श्री. भगवान ढोरकुले, रा. नजिक बाभुळगांव, ता. शेवगांव**

घनकच-याचे व्यवस्थापन कसे करणार आहात तसेच गेवराई रोड ते कारखाना रस्त्याच्या काम तातडीने करण्यात यावे.

- **प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगीतले की**, रस्ता बनविण्यासाठी पाठपुरावा कारखाण्यामार्फत करण्यात येईल. तसेच बॉयलर मधुन निर्माण होणारी राख विटभट्टी धारकांना देण्यात येते व इन्सेनेरेशन बॉयलर मधुन निर्माण होणारी राख पोटॅश रिकव्हरी करण्यासाठी उपयोगात येते.

**९) श्री. संजय रंगनाथ टाकळकर, रा. घोटन, ता. शेवगांव,**

उद्योगामुळे निश्चित फायदा झालेला आहे. विस्तारिकरणामुळे हवेचे, ध्वनीचे प्रदुषण होणार आहे व त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होणार आहे ते कमी करण्यासाठी काय उपाययोजना करणार आहात? स्थानिकांना प्राधान्याने रोजगार देण्यासाठीचा विचार झाला पाहिजे, सी एस आर निधी घोटन व बाभुळगांव या ०२ गावांना जास्तीत जास्त देण्यात यावा.

- **प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगीतले की**, रस्त्यावरील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी पाण्याचा वापर करण्यात येईल.

बॉयलरमधुन निर्माण होणारे हवेचे प्रदुषण कमी करण्यासाठी ई. एस. पी. ही अद्यावत यंत्रणा व ७६ व ८१ मिटर उंचीची चिमणी बसविण्यात आलेली आहे. तसेच कारखाण्याच्या आजुबाजुच्या सर्व परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे लावण्यात आलेले आहेत. तसेच २ ते ३ महिन्यामध्ये आणखी झाडे लावण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

**१०) शालीग्राम शिवनाथ गर्जे, रा. नजिक बाभुळगांव, ता. शेवगांव**

सदर कारखाण्याचे विस्तारिकरण तात्पुरते आहे कि कायमस्वरुपी आहे? याव्यतिरिक्त, ऊसाच्या विविध जाती आणि त्यांच्या लागवडीबाबत मार्गदर्शन दिले जावे.

- **प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगीतले की,** सदर विस्तारिकरण हे कायमस्वरुपीचे आहे. तसेच कारखाण्याच्या परिसरातील संपुर्ण ऊसाचे गाळप करण्यात येईल व ऊस लागवडीसाठीच्या मार्गदर्शनासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल.

**११) श्री. भगवान घनवट, रा. नजिक बाभुळगांव, ता. शेवगांव**

कारखाण्याकडे येणारा रस्ता दुरुस्त व चांगला करण्यात यावा.

**प्रादेशिक अधिकारी तथा सदस्य पर्यावरण समिती यांनी नमुद केले की,** अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पर्यावरण विषयक जनसुनावणी पार पडली असुन उपस्थित नागरिकांनी चांगल्या प्रकारे प्रश्न उपस्थित केले व कारखाण्याच्या वतीने तांत्रीक सल्लागार यांनी चांगल्या प्रकारे उत्तरे दिली. कारखाना व्यवस्थापन चांगल्या प्रकारे काम करीत असल्याचे दिसुन येते या विस्तारिकरणाचा फायदा येथील स्थानिकांना होणार आहे. व तसेच सी एस आर निधीचा फायदा येथील स्थानिक परिसरात होणार आहे. तसेच कारखाण्याने चांगल्या प्रकारची प्रदुषण नियंत्रण सयंत्रणा बसविलेली आहे तसेच भविष्यात देखील ते चांगल्या प्रकारची अद्यावत प्रदुषण नियंत्रण सयंत्रणा बसवणार आहेत. त्यामुळे आजुबाजुच्या परिसरात कमीतकमी प्रदुषण होणार आहे. विस्तारिकरणाचा प्रस्ताव मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने राज्य शासनाकडे सादर करण्यात येईल. तसेच लवकरात लवकर सदर प्रकल्पाला मान्यता मिळावी यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

आयोजक यांनी उपस्थीत नागरिकांचे व मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेल्या ०५ सुचनांची प्रत सोबत जोडलेली आहे.

**(चंद्रकांत शिंदे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अहिल्यानगर

**(विद्यासागर किल्लेदार)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

**(दादासाहेब गिते)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा
निवासी उप जिल्हाधिकारी,
अहिल्यानगर